|| Vidya Vinayen Shobhate ||
Sarvoday Shikshan Sanstha's
**Arts, Commerce and Science College, Umadi.**
Tal-Jath, Dist-Sangli (Maharashtra) Pin -416413
Estd:- 15/07/2002 ( N.G.C.2002/N.M.V./( 01/2002 ) M.S.-3 )
E-mail:-acsumadi@rediffmail.com Office ph.(02344)228330,Principal Ph.228340 Fax-02344228330
Email:-umdi315.cl@unishivaji.ac.in web:- www.acscollegeumadi.co.in

# Criteria VII

**7.1.4: Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and Sensitization of students and employees to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens (Within 500 words).**

सर्वोदय शिक्षण संस्था, संचलित.

## कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदी

## शैक्षणिक वर्ष सन–2018–19 या वर्षाचे सांस्कृतिक कार्यक्रम

| अ. क | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जागतिक योग दिन | 21 / 06 / 2018 |
| 2 | शाहू महाराज जयंती | 26 / 06 / 2018 |
| 3 | अण्णा भाऊसाठे जयंती व लो.टिळक पु.ति | 10 / 08 / 2018 |
| 4 | स्वागत समारंभ व वाङ्मंडळ | 13 / 08 / 2018 |
| 5 | स्वातंत्र्य दिन | 15 / 08 / 2018 |
| 6 | रक्षाबंधन | 26 / 08 / 2018 |
| 7 | शिक्षक दिन | 05 / 09 / 2018 |
| 8 | हिंदी दिन | 14 / 09 / 2018 |
| 9 | सर्जीकल स्ट्राईक डे | 29 / 09 / 2018 |
| 10 | म.गांधी जयंती | 02 / 10 / 2018 |
| 11 | युवा मोहोस्तव | 29 / 10 / 2018 |
| 12 | वाचन प्रेरणा दिन | 15 / 10 / 2018 |
| 13 | पंडित जवाहलाल नेहरू | 14 / 11 / 2018 |
| 14 | संविधान दिन | 26 / 11 / 2018 |
| 15 | महात्मा फुले स्मृतीदिन | 28 / 11 / 2018 |
| 16 | डॉ.बाबासाहेब आबेडकर महापरिनिर्वाण दिन | 06 / 12 / 2018 |
| 17 | नूतन वर्ष स्वागत समारंभ | 01 / 01 / 2019 |

| | | |
|---|---|---|
| 18 | सावित्रीबाई फुले जयंती / माता दिन | 03 / 01 / 2019 |
| 19 | स्वामी विवेकानंद जयंती व माता जिजाऊ जयंती | 12 / 01 / 2019 |
| 20 | प्रजासत्ताक दिन | 26 / 01 / 2019 |
| 21 | लोकशाही पंधरवडा | 26 / 01 / 2019<br>10 / 02 / 2019 |
| 22 | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | 19 / 02 / 2019 |
| 23 | अग्रणी कार्यशाळा | 25 / 02 /2019 |
| 24 | पारंपरीक वेषभूषा दिन | 27 / 02 / 2019 |
| 25 | मराठी राज भाषा दिन | 27 / 02 / 2019 |
| 26 | राष्ट्रीय विज्ञान दिन | 28 / 02 / 2019 |
| 27 | सदिच्छा समारंभ | 01 / 03 / 2019 |
| 28 | जागतिक महिला दिन | 08 / 03 / 2019 |
| 29 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | 14 / 04 / 2019 |
| 30 | सर्वोदय वार्षीक अंक प्रकाशन सोहळा | 01 / 05 / 2019 |
| 31 | एन. एस. एस. अहवाल 2018–19 | ———— |
| 32 | विभागीय अहवाल 2018–19 | ———— |
| 33 | सहल विभाग 2018–19 | ———— |

SU/T2/372
Estd. 2003
Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

सर्वोदय शिक्षण संस्था, संचलित.

## कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदी

### शैक्षणिक वर्ष सन–2019–20 या वर्षाचे सांस्कृतिक कार्यक्रम

| अ. क्र | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जागतिक योग दिन | 21 / 06 / 2019 |
| 2 | शाहू महाराज जयंती | 26 / 06 / 2019 |
| 3 | अण्णा भाऊसाठे जयंती व लो.टिळक पु.तिथी | 01 / 08 / 2019 |
| 4 | स्वागत समारंभ व वाङ्:मय मंडळ उद्घाटन | 07 / 08 / 2019 |
| 5 | स्वातंत्र्य दिन | 15 / 08 / 2019 |
| 6 | शिक्षक दिन | 05 / 09 / 2019 |
| 7 | युवा मोहोस्तव | 20 / 09 / 2019 |
| 8 | म.गांधी जयंती | 02 / 10 / 2019 |
| 9 | वाचन प्रेरणा दिन | 15 / 10 / 2019 |
| 10 | संविधान दिन | 26 / 11 / 2019 |
| 11 | महात्मा फुले स्मृतीदिन | 28 / 11 / 2019 |
| 12 | डॉ.बाबासाहेब आबेडकर महापरिनिर्वाण दिन | 06 / 12 / 2019 |
| 13 | जागतिक एड्स दिन | 07 / 12 / 2019 |
| 14 | काव्यसंमेलन | 20 / 12 / 2019 |
| 15 | नूतन वर्ष स्वागत समारंभ | 01 / 01 / 2019 |
| 16 | माता दिन | 01 / 01 / 2020 |
| 17 | सावित्रीबाई फुले जयंती | 03 / 01 / 2020 |

| | | |
|---|---|---|
| 18 | स्वामी विवेकानंद जयंती व माता जिजाऊ जयंती | 12 / 01 / 2020 |
| 19 | प्रजासत्ताक दिन | 26 / 01 / 2020 |
| 20 | मजेदार आठवडा कार्यक्रम | 10 / 02 / 2020 |
| 21 | अग्रणी कार्यशाळा | 14 / 02 /2020 |
| 22 | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | 19 / 02 / 2020 |
| 23 | मराठी राज भाषा दिन | 27 / 02 / 2020 |
| 24 | राष्ट्रीय विज्ञान दिन | 28 / 02 / 2020 |
| 25 | पदवीदान समारंभ | 01 / 03 / 2020 |
| 26 | जागतिक महिला दिन | 08 / 03 / 2020 |
| 27 | सदिच्छा समारंभ | 01 / 03 / 2020 |
| 28 | एन. एस. एस. अहवाल 2019–20 | ——— |
| 29 | विभागीय अहवाल 2019–20 | ——— |
| 30 | सहल विभाग 2019–20 | ——— |

Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath, Dist-Sangli
SU/T2/372
Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

सर्वोदय शिक्षण संस्था, संचलित.

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उमदी

शैक्षणिक वर्ष सन–2021–2022

| अ.क | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | संविधान दिन कार्यक्रम | 26 /11/2021 |
| 2 | महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन | 28/11/2021 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन | 06/12/2021 |
| 4 | स्वागत समारंभ व वाङ्मय मंडळ उदघाटन | 07/12/2021 |
| 5 | शिक्षक पालक सभा | 23/12/2021 |
| 6 | नवीन वर्षाचे स्वागत | 01/01/2022 |
| 7 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती | 03/01/2022 |
| 8 | स्वामी विवेकानंद जयंती व जिजाऊ जयंती | 12/01/2022 |
| 9 | राष्ट्रीय मतदार दिन | 25/01/2022 |
| 10 | प्रजासत्ताक दिन | 26/01/2022 |
| 11 | शिव जयंती | 19/02/2022 |
| 12 | मराठी राजभाषा दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन | 28/02/2022 |
| 13 | जागतिक महिला दिन | 08/03/2022 |
| 14 | सावित्रीबाई फुले पुण्यतिथी | 10/03/2022 |
| 15 | अग्रणी महाविद्यालय अंतर्गत एक दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा | 16/03/2022 |
| 16 | महात्मा फुले जयंती | 11/04/2022 |
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | 14/04/2022 |
| 18 | 1 मे महाराष्ट्र दिन | 01/05/2022 |
| 19 | छत्रपती शाहू महाराज पुण्यतिथी | 06/05/2022 |
| 20 | मजेदार आठवडा | 23/05/2022 to 27/05/2022 |
| 21 | सदिच्छा समारंभ व पारितोषिक वितरण समारंभ | 28/05/2022 |

| | | |
|---|---|---|
| 22 | जागतिक योग दिन | 21/06/2022 |
| 23 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती | 26/06/2022 |
| 24 | सर्वोदय वार्षिक अंक प्रकाशन सोहळा | 04/07/2022 |
| 25 | लोकमान्य टिळक जयंती | 23/07/2022 |
| 26 | NSS अहवाल | 2021/2022 |
| 27 | विभागीय अहवाल | 2021/2022 |
| 28 | क्रिडा विभाग | 2021/2022 |

SU/T2/372
Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli



राष्ट्रीय मतदार दिना प्रसंगी मतदान जनजागृतीसाठी शपथ घेताना विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.




कार्यक्रमप्रसंगी मतदानाचे महत्व सांगताना प्रा. हुल्याळ सर

# राष्ट्रीय मतदार दिन

सर्वोदय शिक्षण संस्था, संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदी येथे मंगळवार दि-25/01/ 2022 रोजी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीची जाणीव ठेवून ,तसेच नियमांचे काटेकोर पालन करून राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या एस. पी. होर्तिकर अध्यक्ष म्हणून लाभल्या. सोमवार दि-24/0 1/ 2022 रोजी विद्यार्थ्यांसाठी मताधिकार व लोकशाही यासंबंधी निबंध, चित्रकला व घोषवाक्य या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच ऑफलाइन व ऑनलाईन व्हाट्सअपद्वारे निबंध, चित्रकला व घोषवाक्य इतर साहित्य जमा करून घेतले. तसेच विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर मतदान जनजागृती करण्यास प्रोत्साहित व संबोधित करण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक काढून बक्षीस व प्रमाणपत्र महाविद्यालयाकडून देण्यात आले. याप्रसंगी परीक्षक म्हणून प्रा. पाटील ए. बी.प्रा. माळी एम.एस.प्रा. मेघा खानापूर तसेच प्रा. दुधाळ वाय.ए.लाभले या कार्यक्रमप्रसंगी शपथविधीचे वाचन करण्यात आले.त्यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोजके विद्यार्थी उपस्थित होते.

SU/T2/372
Estd. 2003
Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli




भारतीय संविधान दिन निमित्त अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना
प्र.प्रा. डॉ. एस. पी. होनीकर मॅडम




मनोगत व्यक्त करताना प्रा. एम. बी. सोनापुर मॅडम

# संविधान दिन कार्यक्रम

सर्वोदय शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदी येथे शुक्रवार दि-26 /11/2021रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी 10;30 वाजता संविधान दिन कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून सर्वोदय शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदीच्या प्राचार्या डॉ.होर्तिकर एस. पी. या होत्या. तरी या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. माळी एम. एस. हे होते. तसेच उपस्थिती म्हणून प्रा.मेंडीगिरी एम. आय. व मेत्री व्ही. एस. हे होते. प्रथम 26 नोव्हेंबर संविधान दिन म्हणून घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व नंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक प्रा. ए. बी. पाटील यांनी केले . त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला त्यानंतर कु. नमता गायकवाड आणि राजश्री. नंदगौड बीएससी -1 यां वर्गातील मुलींनी सविधान उद्देशिका/ प्रस्तावना वाचन केले. त्यानंतर विद्यार्थी मनोगतातून कु. हिना तांबोळी बीएससी -1 व श्री. विशाल पुजारी बीए-3 यांनी संविधानाचे महत्त्व सांगितले.

तसेच अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्या डॉ.होर्तिकर एस. पी. मॅडमनी संविधानामुळे प्रशासन व शासन चालण्यास मदत होत आहे. सर्वात मोठी लिखित आणि लोकशाही पद्धतीने चालणारी जगातील एकमेव राज्यघटना आहे. भारत देश अखंड, एकसंघ राहिल्याचे श्रेय संविधान हेच होय . तसेच विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांबरोबर इतर अवांतर वाचन केल्याने जीवन समृद्ध व संपन्न होते. हे त्यांनी मनोगतातून व्यक्त केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दुधाळ वाय. ए. यांनी केले. तर आभार प्रा. मेघा खानापुरे मॅडम यांनी मानले. आभार प्रदर्शनानंतर 26/ 11च्या मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांना सभागृहांमध्ये सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आणि कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

SU/T2/372
Estd. 2003
Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli




शिवजयंती निमित्त उपस्थित प्र.प्रा.डॉ. एस.पी होतीकर
मॅडम व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी.




**Shiv Jayanti**

## शिव जयंती

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदी येथे शनिवार दि. 19/ 2 /2022 रोजी सकाळी ठीक 10 वाजता शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.एस पी होर्तिकर यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रा. महाडिक सर यांनी शिवाजी महाराजांचे कार्य तसेच जीवनात येणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कसे जगावे, त्याचबरोबर त्यांच्याकडे असणाऱ्या नेतृत्वाविषयी मार्गदर्शन केले.

Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath, Dist-Sangli
SU/T2/372
Estd. 2003

**I/C PRINCIPAL**
**Arts, Commerce and Science,**
**Umadi,Tal-Jath Dist-Sangli**

**Mata Din :**




आदर्श माता पुरस्कार समारंभात आदर्श माता पुरस्कार देताना महाविद्यालयाचे प्राचार्या व गावातील

इतर महिला वर्ग



Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath, Dist-Sangli
SU/T2/372
Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

# अहवाल

## उमदी महाविद्यालयात माता दिन साजरा

दी.03/01/2019

सर्वोदय शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उमदी व एम यु हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने 03 जानेवारी हा दिवस माता दिन म्हणून साजरा केला. यावेळी आईचे संस्कार हे मानवी जीवनामध्ये सर्वश्रेष्ठ असतात त्यामुळेच मानवी जीवन सुखकर होते. तसेच कोणत्याही कर्तुत्वात पुरुषाला यशाच्या शिखरावर पोहोचण्यासाठी आईचे मार्गदर्शन व संस्कारच उपयोगी ठरतात असे मत या कार्यक्रमाचे प्रमुख वक्त्या डॉ. सौ.मैत्रेणी गदगेप्पागौड यांनी व्यक्त केले. यावेळी आदर्श माता चा सत्कार करण्यात आला. आदर्श माता पुरस्कार या वर्षी बेळुंडगीच्या सौ भौरम्मा सुरेश बोरामणी व हळीच्या श्रीमती कांतवा शिवप्पा गुणापुरे यांना देण्यात आला. स्मृतीचिन्ह शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती रेशमाक्का होर्तीकर , कुसुम आमगोंडा पाटील, मलकव्वा बिराजदार, धानम्मा हिरेमठ, गंगाबाई शिरगट्टी, सुवर्णा होर्तीकरउपस्थित होते.

प्रास्ताविक सर्वोदय शिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री एस के होर्तीकर सर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.गंगनल्ली मॅडम यांनी केले.

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

## <u>Women's Day:</u>




जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी महिलांना व विद्यार्थ्यांनीना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. कमल दणाने व मचावर उपस्थित इतर मान्यवर सत्कार मुर्ती महिला



**Women's Day Celebration**

Arts, Commerce & Science College Umadi, Tal-Jath Dist-Sangli SU/T2/372 Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

**Report:**

# अहवाल

## उमदी महाविद्यालयात 'महिला दिन' संपन्न

दि. 08–03–2019.

उमदी येथील ए.सी.एस. महाविद्यालयात दि. 08–03–2019. रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यकमाचे उद्‌घाटन झाले. महाविद्यालच्या प्रभारी प्राचार्या सौ.डॉ.एस.पी.होर्तीकर यांनी अध्यक्षपद भूषविले. प्रमुख उपस्थिती म्हणून सौ.साबणी सौ. शहा मॅडम मल्लम्मा मठपती रेवती होर्तीकर इत्यादी महिला उपस्थित होत्या. कार्यकमाला उधेशून मार्गदर्शिका डॉ.सौ.कमल दणाणे यांनी महिलांना अन्याय अत्याचारसंबधी स्त्रियांचे संरक्षण करणारे कायदे इ.बाबीचे मौलिक मार्गदर्शन केले. त्यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी कु. आनंद कांबळे, बाबूराव नागणे इत्यादीनी ` महिला दिना निमित आपले विचार मांडले यावेळी प्रा.कु.होर्तीकर शितल प्रा.कु.नराळे ऐश्वर्या प्रा.कु.शिलेदार सी.बी.यांनीही आपले विचार व्यक्त केले.

महिला दिनानिमित खास बाब म्हणून शैक्षणिक सामाजीक व किडा क्षेत्रात काम करणाऱ्या सन्माननीय महिलांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी महाविद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु.रूपा हनगंडी हिने **खेलो इंडिया** या स्पर्धेत वेटलिपिटंग या खेळप्रकारात सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल तिला महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर श्रीमती खाटीक मॅडम सौ.शहा मॅडम इत्यादी अनेक सन्नमाननीय महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यकमाचे स्वागत प्रास्ताविक डॉ. अनिल कांबळे यांनी केले. तर आभार प्रा.संतोष कस्तुरे यांनी मानले. कार्यकमाचे सुत्रसंचालन प्रा.महाडिक टी.ए.यांनी केले.

या कार्यकमावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

विभागप्रमुख

प्राचार्या

Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath Dist-Sangli
SU/T2/372
Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

संकेत टाइम्स

रविवार ता. ११ मार्च २०१८



# उमदी महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

उमदी,वार्ताहर:उमदी(ता.जत) येथील सर्वोदय शिक्षण संस्था संचलित एसीएस कॉलेजमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रा.स्वाती पाटील,अर्चना शिंदे, माधुरी भोसले,सुजाता साबणी, प्राचार्या होर्तिकर एस.पी. आदी उपस्थित होत्या. सूत्रसंचलन अनिल कांबळे प्रास्ताविक प्रासी शिलेदार तर आभार प्रा शितल होर्तिकर यांनी केले.

Arts, Commerce & Science College
SU/T2/372
Estd. 2003
Umadi, Tal-Jath, Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

## Rakshabandhan:



महाविद्यालयामध्ये रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमात सहभागी झालेले प्राध्यापक वर्ग




I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

# अहवाल

## रक्षाबंधन कार्यक्रम

दी.26/08/2018

सर्वोदय शिक्षण संस्थेच्या, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात दी.26/08/2018 रोजी सर्वोदय शिक्षण संस्थेचे सचिव मा श्री एस के होर्तीकर सर यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्षाबंधनाच्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी एम व्ही हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व त्याचबरोबर वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच हा सोहळा अनुपम असाच होता. प्रत्येक विद्यार्थिनी एका विद्यार्थी बांधवांना राखी बांधून त्याचे औक्षण करीत होती त्याचवेळी या महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षकांनी शिक्षक बांधवांना राखी बांधून त्यांचेही औक्षण केले

कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये विशेषत जिल्हा परिषद सांगली माजी अध्यक्षा रेश्माक्का होर्तिकर व संस्था सचिव मा श्री एस के होर्तीकर सर यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व या विषयी भावपूर्ण विचार व्यक्त करून सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्याव कार्यक्रमाची सांगता केली.

या रक्षाबंधनाच्या कार्यक्रमास महाविद्यालय व हायस्कूलचे सर्व विद्यार्थिनींनी सर्व शिक्षक व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath, Dist-Sangli SU/T2/372 Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli

## Republican Day



**Republican Day Celebrated on 26th Jan 2019**

# अहवाल

## 'प्रजासत्ताक दिन'

दि.26/01/2019

सर्वोदय शिक्षण संस्था संचलित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उमदी येथे शनिवार दि. 26/01/2019 रोजी सकाळी 7:00 वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित केला. होता. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव मा.श्री. एस.के. होर्तीकर सर व सर्व संचालक व सदस्य उपस्थित होते. ध्वजारोहणाचा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष श्री. आर.सी.होर्तीकर यांचे शुभहस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक विद्यार्थी ग्रमस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयात राज्य व राष्ट्र पातळीवर विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे सचिव मा. श्री. एस.के.होर्तीकर सर यांचे हस्ते करण्यात आला.


एकूणच प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला.

सां.विभागप्रमुख

प्राचार्या

SU/T2/372
Estd. 2003
Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath, Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli



रा.से.यो. अंतर्गत महाविद्यालयात नवीन मतदार नावनोंदणी करताना प्राध्यापक व विद्यार्थी



रा.से.यो. अंतर्गत महाविद्यालयात महानेत्रदान रॅली काढताना प्राचार्य वैधकीय अधिकारी व प्राध्यापक व विद्यार्थी



स्वामी विवेकानंद जयंती युवक दिन साजरा करताना महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी



# अहवाल

## स्वामी विवेकानंद जयंती

दि.12/01/2019

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमदी येथे दिनांक 12/01/2019 रोजी सकाळी ठिक 10:00 वा. **स्वामी विवेकानंद** यांच्या जयंती निमित्य फोटोपुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक उपस्थित होते या वेळी इतिहास विभाग प्रमुख प्रा.कु.शिलेदार सी.बी.यांनी स्वामी विवेकानंद जयंती यांचे जीवन व कार्य या विषयी मार्गदर्शन केले.

सा. विभागप्रमुख

प्राचार्य

Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath, Dist-Sangli SU/T2/372 Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli




महाविद्यालयाने आयोजित केलेल्या वाचन प्रेरणा दिन (डॉ. ए. पी .जे अब्दुल कलाम जयंती) मार्गदर्शन करताना प्रा. एस.एस होर्तीकर, प्र. प्राचार्य डॉ. होर्तीकर मॅडम, ग्रंथपाल शिवानंद होर्ती, प्रा. माळी.एम.एस



# अहवाल

## उमदी महाविद्यालयात 'डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम जयंती' व 'वाचन प्रेरणा' दिन उत्साहात

दि.15 / 10 / 2018

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उमदी येथे डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या जयंती निमित्त दि.15 / 10 / 2018 रोजी वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांचे अध्यक्षा प्रा.डॉ. एस.पी. होर्तीकर होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रंथालय प्रमूख प्रा.होर्ती एस.सी. व प्रा.शिरगट्टी के.एम. होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.कु होर्तीकर एस.एस.यांनी डॉ. कलाम याच्या जीवनावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य होर्तीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कु.शिलेदार सी.बी.यानी केले. तर आभार प्रा.इम्मनवर सरांनी मानले.

सां.विभागप्रमुख

प्राचार्या

Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath Dist-Sangli
SU/T2/372
Estd. 2003

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli



लोकमान्य टिळक पूण्यतिथी व अण्णाभाऊसाठे जयंती कार्यक्रमावेळी उपस्थित प्र.प्राचार्य सौ.डॉ.होर्तीकर एस.पी.प्रा.माळी एम.एस.प्रा.मेडीगिरी एम.आय.प्रा.डॉ.कांबळे ए.एस.मार्गदर्शन करताना प्रा. होर्तीकर मॅडम



# अहवाल

दि.01–08–2018

## उमदी महाविद्यालयात लोकशाहिर अण्णाभाऊसाठे जयंती दि. 01–08–2018 व लोकमान्य टिळक पूण्यतिथी उत्साहात साजरी

उमदी येथील सर्वोदय शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवार दि.01–08–2019 इ.रोजी लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पूण्यतिथी अत्यंत उत्साहाने साजरी करणेत आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.सौ.एस.पी.होर्तीकर मॅडम यांनी भुषविले. त्याच बरोबर या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित पाहूणे म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री.मेंडिगीरी एम.आय. व प्रा.माळी एम.एस.उपस्थित होते. शिवाय या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.काबंळे ए. एस. उपस्थित होते. त्यांनी लोकशहिर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या विचार कार्यावर प्रकाश टाकून उपस्थित विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.कु.शिलेदार सी.बी.यांनी केले तर आभार प्रा.कु. शितल होर्तीकर यांनी मानले. एकूणच हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

SU/T2/372
Estd. 2003
Arts, Commerce & Science College Umadi, Tal-Jath Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेची पूजन करताना प्रा.माळी एम.एस प्रा.मेंडिगीरी प्रा.शिरगट्टी प्रा. कांबळे अनिल प्रा.इम्मन्नवर व व्हसमनी सर.



# अहवाल

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'महापरिनिर्वाण दिन'

दि. 06/12/2018

सर्वोदय शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय उमदी. येथे गुरूवार दि. 06/12/2018 इ.रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा.डॉ. सौ.एस.पी.होर्तीकर मॅडम उपस्थित होत्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन श्री. विजय सांवत (सह.शिक्षक डी.ई.एम.स्कूल समतानगर उमदी) यांच्या हस्ते करण्यात आले. श्री.सावंत यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आपल्या विचारातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. कोटगोंडे जी.एम. व सांस्कृतिक व मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिल काबंळे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार श्री. कोटगोंडे सर यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.इम्मन्नावर सर यांनी केले तर आभार प्रा.कस्तूरे सर यांनी मानले. व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बी.ए भाग–I च्या विद्यार्थीनी कु. कावेरी शिंदे व शैला कोकरे यांनी केले. अशा तऱ्हेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन हा कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न झाला.

सां विभागप्रमुख

प्राचार्या

SU/T2/372
Estd. 2003
Arts, Commerce & Science College, Umadi, Tal-Jath Dist-Sangli

I/C PRINCIPAL
Arts, Commerce and Science,
Umadi,Tal-Jath Dist-Sangli